# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या १४८ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत

## शुक्रवार, दि.१८ नोव्हेंबर, २०२२ दुपारी ०३:०० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १४८ वी (तातडीची) बैठक शुक्रवार, दि.१८ नोव्हेंबर, २०२२ रोजी दुपारी ०३:०० वा. व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - कुलगुरु | अध्यक्षा |
| २) | डॉ. राजेश गादेवार, प्र-कुलगुरु | सदस्य |
| ३) | डॉ. अ. उ. उबाळे, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी) | सदस्य |
| ४) | सीए श्रेणीक शहा - वित्त व लेखा अधिकारी (निमंत्रित) | निमंत्रित |
| ५) | डॉ. शि. सु. गणपूर - संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ (निमंत्रित) | निमंत्रित |
| ६) | श्रीमती योगिनी घारे - कुलसचिव | सदस्य-सचिव |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

मा. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

डॉ. शैलेंद्र देवळाणकर, मा.प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व डॉ. द. व्यं. जाधव, विभागीय सहसंचालक, (तंत्र शिक्षण), पुणे हे अनुपस्थित होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

सदर बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

**विषय क्र.१ प्रस्तुत विद्यापीठ व भारतीय क्रीडा प्राधिकरण (SAI) यांच्यामध्ये मल्टीपर्पज इनडोअर हॉलबाबत सामंजस्य करार करणेची बाब विचारार्थ.**

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात मल्टीपर्पज इनडोअर हॉल तयार करण्याबाबतचा प्रस्ताव खेलो इंडिया कार्यालय, दिल्ली येथे सादर करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने दिनांक २३/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये सदर योजनांतर्गत प्रस्तुत विद्यापीठास अनुदान रक्कम रु.४.५ कोटी मंजूर झालेले आहेत. तथापि, सदर प्रस्तावाच्या Quarterly Progress Report मधील सहपत्रातील कॉलम नं. १४ मध्ये भारतीय क्रीडा प्राधिकरण (SAI) यांच्यासोबत सामंजस्य करार करणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

खेल प्राधिकरण भारत सरकार यांना Quarterly Progress Report पाठवावयाचा असल्याने तसेच या Report मधील १४ ची पूर्तता करणे आवश्यक असल्याने लवकरात लवकर करार करणे गरजेचे आहे.

त्यानुसार भारतीय क्रीडा प्राधिकरण (SAI) यांच्यासोबत सामंजस्य करार करणेकामी कराराचा मसुदा तयार करण्यात आला आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठ व भारतीय क्रीडा प्राधिकरण (SAI) यांच्यामध्ये मल्टीपर्पज इनडोअर हॉलबाबत सामंजस्य करार करणेची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव | **प्रस्तुत विद्यापीठ व भारतीय क्रीडा प्राधिकरण (SAI) यांच्यामध्ये मल्टीपर्पज इनडोअर हॉलबाबत सामंजस्य करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

विषय क्र.२ **दयानंद इन्स्टिट्युट, सोलापूर या संस्थेच्या अंतर्गत असलेले डी. ए. व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील प्राचार्याच्या पुर्ननियुक्तीसाठी Peer review committee चे अहवाल अद्याप अप्राप्त असल्याने सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी:

१. दयानंद इन्स्टिट्युट, सोलापूर संस्थेच्या अंतर्गत असलेल्या डी. ए. व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील प्राचार्याच्या पुर्ननियुक्तीसाठी Peer review committee मार्फत भरण्यासाठी संस्थेने जा.क्र.२०२१/३५८, दि.२२/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये समितीची मागणी केलेली होती. त्यानुसार त्यांना या कार्यालयाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/शिमा/२०२१-२२/१४९०, दि.०३/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये महाविद्यालयातील प्राचार्य पदाच्या पुर्ननियुक्तीबाबत समिती दिलेली होती.

परंतू, संस्थेने दि. ०१/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य म्हणून डॉ. एस. व्ही. शिंदे यांना मान्यता देण्याबाबत कळविले होते. त्यानुसार त्यांना या कार्यालयाचे दि.०९/१२/२०२१ रोजीच्या टिपणीन्वये पत्र क्र. पुअहोसोविसो/शिमा/२०२१-२२/९३४५, दि.३१/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये एक महिन्याची मान्यता देण्यात आली होती.

२. महाविद्यालयातील प्राचार्य पदाची पुर्ननियुक्ती ही नियमित प्राचार्य पदाचा पाच वर्षाचा कालावधी संपण्यापूर्वी सहा महिन्याच्या आत करणे अनिवार्य आहे. या कार्यालयाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/२०२२/शिमा/१६८८, दि.१०/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दि.०९/०३/२०२२ रोजी पूर्वी कार्यवाही करणे अपेक्षित असताना आपण सदर कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आल्याने संस्थेस प्राचार्य पदाच्या पुर्ननियुक्तीसंदर्भात आपण काय कार्यवाही केली याबाबतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास उलट टपाली तात्काळ कळवावा असे कळविले आहे. संस्थेने जा.क्र. २०२२/१२५, दि.२२/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये तत्कालिन नियमित प्राचार्य डॉ. के. ए. पांडे यांनी पदाची पुर्ननियुक्ती स्विकारणार नसल्याने संस्थेने पुनःश्च एकदा प्रभारी प्राचार्य म्हणून डॉ. एस. व्ही. शिंदे यांना मान्यता देण्याबाबत कळविले आहे.

३. त्याअनुषंगाने संस्थेस पुनःश्च एकदा या कार्यालयाच्या दि. ३०/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संस्थेस महाविद्यालयातील प्राचार्य पदाच्या पुर्ननियुक्ती करीता आपण अद्याप कोणतेही कार्यवाही केली नसल्याचे कळविले होते. तसेच त्यांना प्राचार्य पदासाठी Peer review committee दिली असतानाही आपण त्यानुसार कार्यवाही न करता प्रभारी प्राचार्य म्हणून डॉ.एस.व्ही. शिंदे यांना मान्यता मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली असल्याचे व Peer review committee नुसार कार्यवाही का केली नाही? याबाबत खुलासा दि.०१/०७/२०२२ पर्यंत या कार्यालयास सादर करण्याबाबत व विद्यापीठ

आपल्याला वारंवार कळवित असल्याची बाब संस्थेस कळविली होती.

४. त्यानुसार संस्थेने जा.क्र. २०२२/Inst/९०/१३७, दि. ०१/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संस्थेच्या अंतर्गत असलेले डी.ए.व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील नियमित प्राचार्य पद भरण्याबाबत संस्थेने पुर्ननियुक्तीसाठी Peer review committee ची मागणी असल्यामुळे, त्यांना Committee देण्यात आली परंतू, संस्थेने दि.०७/१२/२०२१ रोजी पुर्ननियुक्तीसाठी लेखी नकार कळविला असल्याचे तसेच महाविद्यालयातील प्राचार्य पद भरण्याबाबत केलेला खुलासा व नियमित पदाची नेमणूक होईपर्यंत दैनंदिन कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी, विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे हित लक्षात घेता संस्थेने प्रा. डॉ. एस. व्ही. शिंदे यांना प्रभारी प्राचार्य म्हणून मान्यता देण्याबाबत पुन:श्च मागणी केलेली आहे.

५. संस्थेस नियमित प्राचार्य पद भरण्यासंदर्भात या कार्यालयाचे पत्र क्र. PAHSUS/TA-१/२०२१-२२/८००९, दि.१०/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते व मा.कुलसचिव कार्यालयाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/कु.का/२०२२/८३८१, दि.१९/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये नियमित प्राचार्य पद पुर्ननियुक्तीसंदर्भात भरण्याकामी व इतर बाबी करीता संस्थेस पत्रान्वये कळविले असता संस्थेने जा.क्र. २०२२/९०/२८६, दि.०२/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये आपले म्हणणे सादर केलेले आहे. सोबत पत्र जोडले आहे.

६. संस्थेचे पत्र क्र. २०२२/Inst/९०/३०१ व ३०२, दि. १५/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संस्थेने महाविद्यालयातील प्राचार्य पद भरण्यासाठी पुर्ननियुक्तीसाठी Peer review committee चे अहवाल व तसेच महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य पदास मान्यता देण्याबाबत कळविले आहे. त्याअनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/शिमा-१/२०२२-२३/८८७३, दि.१६/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संस्थेस विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयास्तव सादर करण्यात येत असून व्यवस्थापन परिषदेचा निर्णय अंदाजे ३ ते ४ दिवसात कळविण्यात येईल असे संस्थेस कळविले आहे.

मा.विभागीय सहसंचालक, सोलापूर यांनी मा. स्थानिक सचिव, दयानंद शिक्षण संस्था, सोलापूर या संस्थेच्या संचलित डी. ए. व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन देयक मागील चार महिन्यापासून या कार्यालयास सादर करण्यात आलेले नसल्याचे पत्रामध्ये नमूद केले आहे. तसेच प्रचलित शासन नियमानुसार महाविद्यालयामध्ये कोणतीही आर्थिक अनियमितता होवू नये यामुळे महाविद्यालयामध्ये नियमित प्राचार्य भरेपर्यंत विद्यापीठाने मान्यता दिलेल्या प्रभारी प्राचार्यांच्या स्वाक्षरीची वेतन देयके दरमहा सादर करणेबाबत या कार्यालयाकडून वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन देयके मागील चार महिन्यापासून या कार्यालयास सादर करण्यात आलेले नसल्याचे याबाबत आपण प्रभारी प्राचार्यांची मान्यता प्रस्तुत विद्यापीठ यांचेकडे प्रलंबित असल्याचे संस्थेने मा. विभागीय

सहसंचालक, सोलापूर यांना कळविले आहे. तसेच दरमहा ०१ तारखेला वेतन आदा करण्याचे शासनाचे धोरण असल्यामुळे डी.ए.व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर या महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्यांना विद्यापीठाची मान्यता घेणेबाबत त्यांचेकडे पाठपुरावा करून मान्यता घेवून वेतन देयके त्वरीत या कार्यालयास सादर करावीत, जेणेकरून सर्व पात्र शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन आदा करण्याबाबतची कार्यवाही या कार्यालयास करता येईल, अन्यथा याबाबत न्यायालयीन अथवा अन्य बाबी उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था/महाविद्यालयाची राहील असे संस्थेस पत्रान्वये कळविले आहे. त्याची एक प्रत माहितीस्तव विद्यापीठास दिलेली आहे.

सबब, दयानंद इन्स्टिट्युट, सोलापूर या संस्थेच्या अंतर्गत असलेले डी. ए. व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील प्राचार्याच्या पुर्ननियुक्तीसाठी Peer review committee चे अहवाल या कार्यालयास अद्याप अप्राप्त असल्याने तसेच महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव :**

१) दयानंद इन्स्टिट्युट, सोलापूर यांचेकडून यापुढे अशा प्रकारच्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही व विद्यापीठाच्या सर्व पत्रांवर तात्काळ कार्यवाही करण्यात येईल असे हमीपत्र घेण्यात यावे.

२) सन २०२२-२३ पासून सदर महाविद्यालयास तीन वर्ष प्रवेश क्षमतेपेक्षा वाढीव विद्यार्थी संख्या देण्यात येऊ नये. तसेच नवीन विषय, अभ्यासक्रम, अतिरिक्त तुकडी इ. देण्यात येऊ नये.

३) विद्यापीठाकडून सदर महाविद्यालयास पुढील तीन वर्ष कोणतेही अनुदान (उदा. Seminar/Conference /Seed Money) व इतर प्रकल्प (Project) मंजूर करण्यात येऊ नये.

४) महाविद्यालयाने कोणत्याही प्रकरणाबाबत विद्यापीठाची समाजात बदनामी होणार नाही याची दक्षता घ्यावी.

५) संस्थेने त्यांच्या कला व विज्ञान महाविद्यालय आणि वाणिज्य महाविद्यालयातील प्राचार्य पद भरतीबाबत बिंदुनामावली तपासणी, जाहिरात मान्यता याबाबत आजपावेतो काय कार्यवाही करण्यात आली आहे याचा अहवाल तात्काळ विद्यापीठास सादर करावा.

६) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार महाविद्यालयाने प्राचार्य पद भरण्याबाबत कार्यवाही न केल्यामुळे आणि विद्यापीठास योग्य तऱ्हेने प्रतिसाद देण्यास अतिविलंब केल्यामुळे संस्थेकडून रु.५,००,०००/- इतका द्रव्यदंड का आकारण्यात येवू नये? याबाबत विचारणा करुन त्याबाबतची सुनावणी तात्काळ घेवून मा.कुलगुरु महोदयांनी निर्णय घ्यावा.यावा.

वरील सर्व अटीपूर्ततेच्या अधिन राहून संस्थेने मागणी केल्यानुसार, डी. ए. व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य म्हणून डॉ. एस. व्ही. शिंदे यांना ३ महिन्यासाठी मान्यता देण्यात यावी. सदर कालावधीत नियमित प्राचार्य पद भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्र.३ १८ व्या दीक्षांत समारंभाकरिता मार्च/एप्रिल, २०२२ अखेर सर्व विद्याशाखेच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या व नोव्हेंबर/डिसेंबर, २०२२ अखेर पर्यंत सर्व विद्यावाचस्पती पदवी संपादित करणाऱ्या स्नातकांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत विद्यापरिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांनी केलेली शिफारस विचारार्थ.**

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना पदव्या, पदविका प्रमाणपत्रे, विद्यावाचस्पती पदवी प्रदान करणे याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२८ (१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

| | |
|---|---|
| कलम १२८ (१) | "व्यवस्थापन परिषदेस, विद्यापरिषदेकडून शिफारस करण्यात येतील अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक इतर विशेषोपाधी सुरु करता येईल आणि प्रदान करण्यात येतील." |

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमातील वरील तरतुद विचारात घेता मार्च/एप्रिल, २०२२ अखेर विद्याशाखेच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या व नोव्हेंबर/डिसेंबर, २०२२ अखेर पर्यंत विद्यावाचस्पती पदवी संपादित करणाऱ्या स्नातकांना पदव्या,पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याची बाब महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनूसार विद्यापरिषदेच्या वतीने व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करणे आवश्यक आहे. परंतु नजीकच्या कालावधीमध्ये विद्यापरिषदेच्या बैठकीचा दिनांक निश्चित झाला नसल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतुदीनुसार तातडीची बाब म्हणुन सदरच्या विषयास दि.३१/१०/२०२२ रोजीच्या मान्यतानूसार विद्यापरिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांनी मान्यता दिली आहे. सदर मान्यता आगामी काळात होणाऱ्या विद्यापरिषदेच्या बैठकीत माहितीस्तव ठेवण्यात येईल.

सबब, १८ व्या दीक्षांत समारंभात मार्च/एप्रिल, २०२२ अखेर सर्व विद्याशाखेच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या व नोव्हेंबर/डिसेंबर, २०२२ अखेर पर्यंत विद्यावाचस्पती पदवी संपादित करणाऱ्या स्नातकांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत विद्यापरिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांनी केलेली कार्यवाही विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **१८ व्या दीक्षांत समारंभाकरिता मार्च/एप्रिल, २०२२ अखेर सर्व विद्याशाखेच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या व नोव्हेंबर/डिसेंबर, २०२२ अखेर पर्यंत सर्व विद्यावाचस्पती पदवी संपादित करणाऱ्या स्नातकांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत विद्यापरिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांनी केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.४ शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलास व संलग्नित सर्व महाविद्यालयास सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा दुरुस्तीसह निश्चित करुन विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस स्विकारण्याबाबत तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव दि.१८/०७/२०२२ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आली होती. त्यात अंशत: बदल करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३३ (१) (प) व (य) मधील तरतुदीच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा दरवर्षीप्रमाणे निश्चित करणे आवश्यक असल्याने सदरील बाब अधिष्ठाता मंडळाच्या विचारार्थ सादर केली असता, त्यावर अधिष्ठाता मंडळाने दि.११/०४/२०२२ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

ठराव: शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करुन विद्यापरिषदेस शिफारस करण्यात आली.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा

| अ. क्र. | विद्याशाखा | प्रथम सत्र | | द्वितीय सत्र | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रारंभ | समाप्ती | प्रारंभ | समाप्ती |
| १. | कला, वाणिज्य, विज्ञान, सामाजिक शास्त्रे (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक संकुले) एम.एस.डब्लु. (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये) | १५ जुलै, २०२२ | १५ नोव्हेंबर, २०२२ | १० डिसेंबर, २०२२ | ३० एप्रिल, २०२३ |
| २. | विधी व शिक्षणशास्त्र (बी.एड., बी.पी.एड., एम.एड., एम.पी.एड. एम. ए. एज्युकेशन इ.) (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये) | १५ जुलै, २०२२ | १५ नोव्हेंबर, २०२२ | १० डिसेंबर, २०२२ | ३० एप्रिल, २०२३ |
| ३. | अभियांत्रिकी, तांत्रिक अर्किटेक्चर, फार्मसी, व्यवस्थापन अभ्यासक्रम एम.बी.ए. इ. (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ संकुले) | ०१ ऑगस्ट, २०२२ | १५ डिसेंबर, २०२२ | १५ जानेवारी, २०२३ | ३१ मे, २०२३ |

२१ ऑक्टोंबर ते २७ ऑक्टोंबर, २०२२ या कालावधीत दिपावली निमित्त सुट्टी देय राहील.

सबब, उक्त ठरावाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता विद्यापीठ परिसरातील सर्व संकुल व संलग्नित सर्व महाविद्यालयाकरीता सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा निश्चित करुन अधिष्ठाता मंडळाने विद्यापरिषदेस केलेली शिफारस विचारार्थ असा विषय विद्यापरिषदेस सादर केला असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| ठराव | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता विद्यापीठ परिसरातील सर्व संकुल व संलग्नित सर्व महाविद्यालयातील सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा अधिष्ठाता मंडळाने विद्यापरिषदेस केलेली शिफारस खालील दुरुस्तीसह स्विकारुन व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली.<br>१. अ.क्र.१ मध्ये प्रथम सत्राच्या प्रारंभ तारीख १५ जुलै, २०२२ ऐवजी ०१ ऑगस्ट, २०२२ व समाप्ती तारीख १५ नोव्हेंबर, २०२२ ऐवजी २५ नोव्हेंबर, २०२२<br>२. अ.क्र.२ मध्ये समाप्ती तारीख १५ नोव्हेंबर, २०२२ ऐवजी २५ नोव्हेंबर, २०२२<br>३. दि.२१ ऑक्टोंबर, २०२२ ते दि.३१ ऑक्टोंबर, २०२२ या कालावधीत दिपावली निमित्त सुट्टी देय राहील. |

दरम्यानच्या कालावधीत तातडीने परिपत्रक निर्गमित करुन विद्यापीठ परिसरातील संकुलास व संलग्नित महाविद्यालयास कळविणे आवश्यक होते, त्यामुळे मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेली मान्यतेस अनुसरुन प्रशासकीय कार्यवाही करण्यात आलेली आहे. सोबत दिनांक २८/०६/२०२२ रोजीच्या मान्यतेची व परिपत्रकाची छायांकित प्रत जोडली आहे.

सदरील बाब दि.२८/०७/२०२२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत माहितीस्तव सादर केले असता त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

| | |
|---|---|
| ठराव | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलास व संलग्नित सर्व महाविद्यालयास सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा दुरुस्तीसह निश्चित करुन विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस स्विकारण्याबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |

सदर प्रकरणी National Dalit Movement for Justice (NDMJ) चे सदस्य यांनी दि. १६/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये महाविद्यालयाची सत्र समाप्ती २५ नोव्हेंबर पासून

होत आहे. २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून सार्वत्रिक ठिकाणी साजरा करण्यात येतो. यास्तवर सत्र समाप्ती २५ नोव्हेंबर ऐवजी २७ नोव्हेंबर पासून करण्याबाबत विनंती केली आहे. त्या अनुषंगाने दि. १६/११/२०२२ रोजीच्या पत्रावर प्राप्त झालेल्या पृष्ठांकनाच्या अनुषंगाने दि. १७/११/२०२२ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करण्यात आली होती. त्यावरील आदेशानुसार वरील प्रमाणे व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत फेरसादर करण्यात येत आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलास व संलग्नित सर्व महाविद्यालयास सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा दुरुस्तीसह निश्चित करुन विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस स्विकारण्याबाबत तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) अन्वये केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव दिनांक १८/०७/२०२२ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आली होती. त्यामध्ये अंशत: बदल करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलास व संलग्नित सर्व महाविद्यालयास सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा दुरुस्तीसह निश्चित करुन विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस स्विकारण्याबाबत तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव दि.१८/०७/२०२२ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आली होती. त्यात अंशत: बदल करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

मा.कुलगुरु तथा अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय

विषय क्र.५ डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य पदांच्या मान्यतेची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य पद भरतीबाबत चर्चा झाली व चर्चेअंती सदर महाविद्यालयास पत्र पाठवून प्राचार्य पद भरतीबाबत ७ दिवसात अहवाल सादर करावा, तद्‌नंतरच प्रभारी प्राचार्य मान्यतेबाबतची कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले. |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद